# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 13/03/2023 (सोमवार) दुपार

---

## विनयभंग

**पो.स्टे. केळवद** :— दिनांक ११/०३/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक १२/०३/२०२३ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी वय २६ वर्ष ही आपली मोठी आई नामे— गं. भा. अनुसया मेघराज चांदेकर रा. ढालगावखैरी यांच्या घरी असताना आरोपी नामे— विनय सुरेश राउत, वय २९ वर्ष, रा. मालेगाव ता. सावनेर याने घरासमोर येवुन फिर्यादी व मोठी आईला शिवीगाळ केली व ढालगावखैरी पासुन सावनेर पर्यंत पाठलाग करुन मी तुला कोणाची होवु देणार नाही असे म्हणुन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(ड), ५०४, ५०६ भादंवी कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास झिने मो. नं. ८१८०९७५१२५ करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ किमी अंतरावर टेकाडी कन्हान येथे दिनांक १२/३/२०२३ चे ७.०० वा. ते ७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अनिल ऋशीकेश गजभिये, वय ४८ वर्ष रा. अशोक नगर कन्हान व फिर्यादीचा मामा नामे— डोमाजी बारमाटे हा टेकाडी कन्हान ला राहतो याला दोन मुले आहेत त्याचा मुलगा नामे—सुनिल बारमाटे वेगळा राहतो मुलगी गिता हिने म्हटले की ‘‘तु १० हजार रू. सुनिल कडुन घेतले.’’ दि. १२/३/२०२३ ला सकाळी ०७.०० वा. मामा व मामे भाऊ नामे— सुनिल बारमाटे यांना भेटण्याकरिता गेले तेव्हा त्याला विचारले कि मी तुझाकडुन १० हजार कधी घेतले यावरून सुनिल बारमाटे याने फिर्यादीला शिवीगाळ केली व काठीने डोक्यावर दोन्ही हाताला हातभुक्याने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ३६० पाल मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर